# मुक्त अर्थव्यवस्थेचे सामाजिक परिणाम आणि मराठा क्रांती मुक मोर्चा

**ऋतुराज किशोर माने**, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रस्तावना :**

१५ ऑगस्ट १९४७ भारत स्वतंत्र झाल्यापासून भारताने 'मिश्र अर्थव्यवस्था' स्विकार केला. भारताचे तत्कालिन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यावर समाजवादी विचारसरणीचा परिणाम होता. त्यामुळे देशाची व नागरिकांची जडणघडण त्याच विचारसरणीवर झाली व ती पुढे १९९० पर्यंत सुरू राहिली.

१९९१ मध्ये भारतावर आर्थिक संकट झाले व यातून सावरण्यासाठी भारताने खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण हे धोरण तत्कालिन प्रधानमंत्री पी.व्ही. नरसिंहराव व अर्थमंत्री मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली स्विकारली व त्याचे चांगले व वाईट दोन्ही परिणाम देशातील नागरी समाजावर झाले. याच मुक्त अर्थव्यवस्थेचा परिणाम महाराष्ट्रातील मराठा समाजावर कशा पध्दतीने झाला व त्याचे पुढे परिणाम झाला.

**उद्देश :**

१) मुक्त अर्थव्यवस्थेचा सामाजिक परिणाम अभ्यासणे.

२) मुक्त अर्थव्यवस्थेचा मराठा समाजावर कसा परिणाम झाला.

३) मराठा समाजाची मुक्त अर्थव्यवस्थेनंतरची आर्थिक, सामाजिक परिस्थिती अभ्यासणे.

कि—वर्डस— (सुचक शब्द)

१) मुक्त अर्थव्यवस्था २) मराठा ३)सामाजिक ४) आर्थिक ५) जागतिकीकरण ६) खाजगीकरण ७)उदारीकरण ८) क्रांती ९) आरक्षण १०)मोर्चा

**मुक्त अर्थव्यवस्थेचे सामाजिक परिणाम आणि मराठा समाज:**

भारत हा मुख्यत: कृषीप्रधान देश उत्तरेस गंगा नदीपासून दक्षिणेस कावेरी नदीपर्यंत अनेक नद्यांनी येथील जमीन सुजलाम सुफलाम केली आहे. देशातील भौगोलिक क्षेत्र व लोकसंख्या याचा विचार करता महाराष्ट्र हे प्रमुख राज्य आहे. येथील लोकांचा १९९० च्या आधी शेती हा प्रमुख व्यवसाय होता. सध्या महाराष्ट्रात ४० टक्केहून अधिक लोक हे मराठा समाजाचे आहे. बहुतांश मराठा समाज हा शेतकरी व कुटीर उद्योग व्यवसाय करणारा आहे. वाढत्या लोकसंख्येसोबतच शेतीचे तुकडीकरण झाले. आणि एकेकाळी २०—३० एकर शेती असणाऱ्या मराठा परिवाराचे शेतीचे क्षेत्र १—२ एकर किंबहूना गुंटयावर आले. याच काळात देशसुध्दा आर्थिकदृष्टया अडचणीत होता व देश चालवण्यासाठी तत्कालिन भारतीय प्रधानमंत्री पी.व्ही.नरसिंहराव यांनी 'खाउजा' म्हणजे खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण हे धोरण स्विकारले आणि याचा परिणाम कष्टकरी मराठा समाजावर पडला. देशाची जरी यातून आर्थिक स्थिती सुधारली. पण महाराष्ट्रातील किंबहुना देशातील अनेक छोटे—मोठे कुटीर उद्योग मोडकळीस निघाले व त्याचा थेट परिणाम नागरी समाजावर पडलेला दिसून येतो.

मुक्त अर्थव्यवस्थेमुळे शहरीकरण होण्यास सुरू झाले. सुपीक जमीनीवर मोठ—मोठया टोलेजंग रहिवाशी व व्यापरी संकुले उभारली जाऊ लागली. याचा शहराजवळ औद्योगिक वस्ती उभारली जाऊ लागले. मोठ—मोठया धरणासाठी सुपिक जमीन वापरली गेली. यामुळे अनेक मराठा कुटुंब भूमिहीन झाली. जागतिकीकरणामुळे जरी अनेक प्रकल्प कंपनी आल्या तरी त्यामध्ये काम करण्यासाठी जी कुशलता कौशल्य लागणार होते हे मराठा समाजाकडे त्या काळात नव्हती. याचबरोबर शेती एके शेती हाच उद्योग मानल्यामुळे शैक्षणिक मागासपण सुध्दा मराठा समाजाकडे मोठया प्रमाणात होते. यामुळे शेती करायची तर नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, महापुर, गारपीठ यामुळे शेतीमालास चांगला भाव मिळेना. यामुळे बहुतांश मराठा समाज देशोधडीला लागला. कारण ४० टक्क्यातील फक्त मुठभर लोकांकडे सत्ता होती व त्यांनी फक्त स्वत:चा विकास केला होता. यामुळे असंतोषीत

मराठा समाजातील तरुणांनी आपल्या हक्कासाठी व मागण्यांसाठी विविध संघटना स्थापन केल्या जर संपूर्ण समाजाची प्रगती कशी करायची यासाठी मराठा समाजाने आत्मचिंतन केले तेव्हा मराठा समाजास असे कळून चुकले की मराठा समाजास जोपर्यंत आरक्षण मिळणार नाही तोपर्यंत मराठा समाजाची आर्थिक व शैक्षणिक प्रगती होणार नाही या समाजातून मराठा आरक्षण मागणी जोर धरू लागली.

साधारणत: १९८० पासूनच मराठा समाजाला आरक्षण मिळावे अशी मागणी सुरु होती. या काळात स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाचे एकत्रीकरण व मागण्या यासाठी प्रयत्न सुरु होते. खाजगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरण या प्रक्रियेनंतर मराठा समाजास आरक्षणाची जास्त गरज वाटू लागली. कारण आरक्षणामुळे सोबतच्या अनेक समाज्यांनी आपली प्रगती केली होती. याचे प्रमुख कारण होते. शिक्षणामध्ये आरक्षीत जागा, फी मध्ये सवलत, शिष्यवृत्ती याचसोबत सरकारी नोकरी मध्ये असणाऱ्या आरक्षीत राखीव जागा या सर्वांचा विचार करुन आपल्या प्रगतीसाठी मराठा समाजाने आरक्षण मागणीसाठी चळवळ सुरु केली. मराठा समाजाने संपूर्ण महाराष्ट्र व सीमा भागात सुध्दा अनेकदा लोकशाही मार्गाने आंदोलन केली आपली मागणीपत्रे निवेदन सरकारला दिली पण मराठा समाजास आरक्षण चळवळीस यश येत नव्हते.

२०१४ साली सर्वप्रथम तत्कालीन काँग्रेस व राष्ट्रवादी सरकारने राणे समितीच्या शिफारशीने शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास असे आरक्षण मराठा समाजास दिले पण पुढे ते कोर्टात टिकले नाही व सरकार ने मराठा समाजास दिलेले १६ टक्के आरक्षण गेले. १३ जुलै २०१६ रोजी अहमदनगर जिल्हयातील कोपार्डी येथे महाराष्ट्र हादरुन टाकणारी कोपार्डी बलात्कार प्रकरण घडले यामध्ये पीडितेची हत्या झाली व तीच्या घरच्यांवर अत्याचार झाला यासर्व प्रकरणामुळे अनेक वर्ष मराठा समाजाचा जो असंतोष होता तो बाहेर पडला याची सुरवात छत्रपती संभाजीनगर येथून झाली. ९ ऑगस्टला क्रांती दिनाचे औचित्य साधून मराठा समाजाने शांततेच्या मार्गाने विराट असा मराठा क्रांती मुक मोर्चा काढला. देशाच्या स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्यांदाच असा आदर्शवत असा मोर्चा निघाला होता.

**या मोर्चातील प्रमुख मागण्या होत्या:**

१) कोपार्डी घटनेतील आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे.
२) नोकरी व शिक्षणामध्ये मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे.
३) शेतकऱ्यांना कर्जमाफी झाली पाहिजे.
४) शेतकऱ्यांच्या मालास हमीभाव मिळाला पाहिजे.
५) अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळास ५०० कोटी आर्थिक निधी मिळाल्या पाहिजे.
६) मराठा समाजातील बेरोजगार तरुणांना सक्षम बनवण्यासाठी रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजे.
७) आत्महत्याग्रस्त्र शेतकऱ्यांच्या कुंटूंबाचे पूनवर्सन झाले पाहिजे.
८) छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रात स्मारक झाले पाहिजे.
९) महाराष्ट्रातील गड किल्ल्यांचे संवर्धन झाले पाहिजे.
१०) ॲट्रासिटी ॲक्टमध्ये दुरुस्ती झाली पाहिजे.

आदी मागण्यांसह छत्रपती संभाजीनगर मध्ये सुरु झालेला मोर्चा संपूर्ण महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर असे ५८ मोर्चे लाखोंच्या संख्येने निघाले बीबीसी सारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रसारमाध्यमांनी याची नोंद घेतली तर काही मोर्चाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली.

मराठा क्रांती मुक मोर्चातीलवरील मागण्यांकडे पाहिले. असला आपल्याला असे दिसून येते की, १९९१ नंतर भारताने जी मुक्त अर्थव्यवस्था स्विकारली यामुळे जे जागतिकीकरण खाजगीकरण व उदारीकरण झाले याचा सामाजिक व आर्थिक परिणाम हा

महाराष्ट्रातील मराठा समाजावर झाला. याचा हा दुष्परिणाम मराठा समाजाची दुसरी पिढी सुध्दा भोगत आहे. सामाजिक व आर्थिक सुधारणेसाठी मराठा समाजास सध्या आरक्षणाची गरज आहे.

**मराठा क्रांती मुक मोर्चाची फलश्रुती:**

मराठा समाजाने आपल्या मागण्यांसाठी जे ५८ मोर्चे काढले याची फलश्रुती म्हणून म्हणा किंवा मराठा समाजावर होत असलेल्या अन्याय म्हणून तत्कालीन दैवेंद्र फडणवीस यांच्या युती सरकारने मराठा समाजास शिक्षण व नौकरीत असे १२ व १४ टक्के आरक्षण दिले मराठा तरुणांना उच्च शिक्षणात साहय करण्यासाठी सारथी संस्थेची स्थापना केली. यातुन विविध कौशल्य शिक्षण, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन व आर्थिक सहाय्यता मिळणार होती. याच सोबत अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून नव उदयोजक तरुणांना आर्थिक साहाय्य मिळत आहे.

परंतु पुढे काही दिवसातच सरकारने दिलेले हे आरक्षण कोर्टात टिकले नाही कारण घटनने आरक्षणाची जी चौकट सांगितली आहे. त्यास ते धरुन नव्हते यामुळे मराठा समाजाची आज देखील मराठा आरक्षणाची मागणी प्रलंबीत आहे.

**निष्कर्ष:**

१) मुक्त अर्थव्यवस्थेमुळे देशाची जरी आर्थिक प्रगती झाली असली तरी त्याचे सामाजिक व आर्थिक परिणाम येथील नागरी समाजावर झाले जागतिकीकरण उदारीकरण, खाजगीकरण यामुळे अनेक प्रकल्प आले नव्याने शहरीकरण औदयोगीकरण झाले पण यासर्वामुळे सुपीक जमीन सर्व या प्रक्लपासाठी गेली वाढत्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याची कमतरता भासू लागली. यामुळे हायब्रीड बियाणांचा वापर वाढला. यामुळे उरलेल्या सुपीक जमीनीचा दर्जा खालावत आहे. जमीनी नापिक होत आहे.

२) मुक्त अर्थव्यवस्थेमुळे महाराष्ट्रातील मराठा समाजाचे कुटीर उदयोग मोडकळीस निघाले शेतीच्या तुकडीकरणामुळे शेती व्यवसाय पण सोडून दिला. शैक्षणिक मागासलेपणामुळे रोजगार मिळेना यामुळे मराठा समाजाला आपल्या विकासासाठी आरक्षण हे प्रमुख साधन वाटले आरक्षणाचे फायदे समजले यामुळे मराठा समाजाने आरक्षणाची मागणी जोर धरुन मागे लावली.

३) मराठा क्रांती मुक मोर्चामुळे जरी मराठा समाजाच्या थोडया मागण्या मान्य झाल्या असल्या तरी मराठा समाजाची मुळ आरक्षणाची मागणी अजुन अपूर्णच राहिली आहे.

**समारोप:**

मुक्त अर्थव्यवस्थेचा देशाच्या अर्थव्यवस्थेला जसा चांगला परिणाम पाहायला मिळाला तसे अनेक दुषपरिणाम सुध्दा झाले यामधील एक देशातील पारंपारिक कुटिर उदयोग मोडकळीस निघाले. तुकडीकरण व शेतीस हमीभाव न मिळाल्याने शेतकरी वर्गाची अवस्था दैयनीय झाली. महाराष्ट्रातील मुख्य असणारा मराठा समाजाचा शेती व कुटिर उदयोग हे प्रमुख व्यवसाय होते. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण यामुळे समाजाची अवस्था दैयनीय झाली व समाजास आरक्षण मागण्याची वेळ आली व यासाठी मराठा समाजाने 'मराठा क्रांती मुक मोर्चा' च्या माध्यमातून आपल्या मागण्या सरकारला सांगितल्या.

**संदर्भसूची:**

1) जाधव नामदेवराव, ''मराठा क्रांती मोर्चा भविष्य आणि वाटचाल''

2) पाटील मधुकर, ''एक मराठा लाख मराठा वर्तमान व भविष्य..?''

3) https://lokmat.news18.com/mumbai/big-relief-tosebc-and-esbc-cutegories-as-maharashtra-government-took,important-decision-read-more-mhds-578715.html

4) https://www.unishivaji.ac.in/uploads/distcdu/home/sim%202015/m%20A%2011%20sociology%20soc%20021%20G10b.%20&%20sociely.pdf.